असे होते

# ना. गोखले



V2w M66

V2wM66
K6
109446

# असे होते
# नामदार गोखले



लेखक :

दत्ता श्री. टोळ

बी. ए., बी. कॉम.

प्रकाशक

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणे २.

प्रकाशक :
अ. ज. प्रभु
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार पेठ, पुणे २

*

सर्व हक्क सुरक्षित

*

प्रथमावृत्ती १९६६
गोखले जन्मशताब्दी

*

मूल्य रु. १=२०

*

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणे २.

# स्वागत

थोरांची चरित्रे ही दीपस्तंभासारखी असतात. काळाच्या महासागरातून चाललेली समाजजीवनाची नौका संकटांच्या खडकांवर आपटून फुटू नये, म्हणून हे दीपस्तंभ सदैव अंधारात प्रकाश दाखवीत राहतात. त्यांच्या चरित्रांत समाजाला आपले हरवलेले सत्त्व सापडते आणि कशासाठी जगावे, कशा रीतीने जगावे, हे त्याला समजते. म्हणूनच प्रत्येक नव्या पिढीपुढे थोरांच्या चरित्रांचा आदर्श ठेवावा लागतो. अशी चरित्रे पुनः पुनः सांगावी लागतात.

ना. गोपाळ कृष्ण गोखले हे अशाच प्रकाशदायी महात्म्यांपैकी एक आहेत. त्यांनी आपल्या सत्यप्रियतेने, सचोटीने, अभ्यासू वृत्तीने आपल्या थोर जीवनाची घडण केली आणि आपल्या थोरपणाने आपल्या देशालाही थोर बनविले. लहानपणी अनाधिकाराने प्राप्त झालेला पहिला क्रमांक नाकारणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्याने पुढे सत्याचे व्रत आचरणाऱ्या महात्मा गांधींचे गुरुत्व भूषविण्याइतकी महती कशी प्राप्त केली, याची उद्‌बोधक कहाणी म्हणजे ना. गोखल्यांचे चरित्र !

ना. गोखल्यांच्या चरित्राचे हे उद्‌बोधक स्वरूप बालमनावर ठसविण्यासाठी श्री. दत्ता श्री. टोळ यांनी हे छोटे पुस्तक लिहिले आहे. गोखल्यांच्या जीवनकथेतील वेधक आणि वेचक प्रसंग निवडून आणि त्या प्रसंगाच्या मालिकेत गोखल्यांच्या महात्मतेचे सूत्र कुशलतेने गुंफून त्यांनी ही वाङ्मयीन पूजा गोखल्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या चरणी अर्पण केली आहे.

या निमित्ताने सर्व भारतभर ना. गोखल्यांवर स्तुति-सुमनांचा वर्षाव होईल; महान् पंडित आणि विचारवंत त्यांच्या चरित्रावर ग्रंथराज लिहितील; त्यांचे राजकीय अनुयायी त्यांचा वारसा जागवण्याचा प्रयत्न करतील; केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकार त्यांची स्मृती शासकीय इतमानाने साजरी करील. या सर्व गौरवसमारोहात श्री. टोळ यांनी यथाशक्ती केलेले हे स्मृतिचिंतन ना. गोखल्यांच्या अंतरात्म्याला आवडेल, हे निःसंशय.

श्री. टोळ यांनी केलेली प्रसंगांची निवड बालवाचकांच्या दृष्टीने आकर्षक आणि उद्‌बोधक आहे; त्या प्रसंगाची गुंफण त्यांनी अशा कुशलतेने केली आहे की, त्यांतून चरित्राचा ओघ वाहता रहावा आणि त्यातून चरित्र-नायकाची थोरवी चढत्यावाढत्या क्रमाने वाचकाच्या मनावर ठसत जावी; त्यांची शैली सुबोध आणि रंजक आहे.

बालवाचक श्री. टोळ यांच्या पुस्तकाचे मनापासून स्वागत करतील, असा मला विश्वास वाटतो.

‘ लोककल्याण ’ रामचंद्र चिंतामण ढेरे
७७ शनिवार, पुणे २